महाराष्ट्र शासन

# विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**विकास- आस्थापना विभाग**

पत्ता: फाजीलपूरा, दिल्ली गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर पिन-431001, दुरध्वनी क्र.(0240)-2330902, Email : dycomest11@gmail.com

जा.क्र.2025/जि.प./आस्था-1/कावि- दि. 26/12/2025

**(ई-मेल संदेश)**

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद,
छत्रपती संभाजीनगर विभाग (सर्व)

**विषय :-जिल्हा परिषद कार्यालयातील वर्ग-3 व वर्ग-4 या संवर्गातील संघटनेच्या मागण्यांचे अनुषंगाने बैठकांचे आयोजन करणे बाबत..**

संदर्भ :- प्रस्तूत कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक -2025/विकास (आस्थापना)/आस्था-1/प्र.क्र.34, दि.11/11/2025

उपरोक्त विषयी जिल्हा परिषद संवर्गातील वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, 1967 मधील नियम (6) नूसार प्रथमत: त्यांचे निकटचे प्राधिकरणाकडे अर्ज / पत्रव्यवहार करणे बंधकारक केलेले असून महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, 1967 मधील नियम (6) नूसार "जिल्हा परिषद कर्मचारी ज्यांना निकट दुय्यम असेल अशा प्राधिकरणांव्यतिरिक्त अन्य प्राधिकरणांशी संपर्क साधण्यास बंदी-(1) कोणताही परिषद कर्मचारी, त्यांच्या कार्यालयीन कर्मचा-यांच्या संबंधात किंवा जिल्हा परिषदेचा कर्मचारी या नात्याने त्याच्यावर व्यक्तिश: परिणाम होईल असा कोणत्याही बाबीसंबंधात तो ज्याला निकट दुय्यम असेल अशा प्राधिकरणाखेरीज अन्य कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणाशी कोणताही थेट पत्रव्यवहार करणार नाही," अशी तरतूद विषद केलेली असून या बाबत प्रस्तूत कार्यालयामार्फत परिपत्रकाव्दारे सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषदेतंर्गत वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी संघटना या त्यांचे संवर्गातील मागण्याविषयी प्रस्तूत कार्यालयाकडे निवेदन / पत्रव्यवहार करतात. वास्तविक संघटनेच्या निवेदनातील मागण्याचे अवलोकन करता, एकंदरीत सर्वच मागण्या या जिल्हापाळीवरील व सहजरित्या निकाली निघण्यासाख्या असल्याचे निदर्शनास येत आहे.

*वास्तविक आपले अधिनिस्त* ***जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, ग्रामपंचायत विभाग, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, कृषी विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र ग्रामीण रोजीगार हमी योजना, महिला व बाल कल्याण विभाग, समाज कल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग, शिक्षण विभाग (प्राथमिक / माध्यमिक / योजना), लघू पाटबंधारे विभाग, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान*** हे विभाग असून सदर विभागातील कार्यरत वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील सर्व संघटनाच्या मागण्या या जिल्हास्तरावरील असतात तसेच आपण वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी असून त्यांचे आस्थापनाविषयक अधिकार हे आपणास आहेत.

या अनुषंगाने आपणास निर्देश देण्यात येते की, वरिल विभागाशी संबंधित जिल्हा परिषद संवर्गातील वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचारी संघटना, पेशनर्स (सेवानिवृत्त) संघटना, कॉस्ट्राईब संघटना व इत्यादी संघटनांची

***मागे चालू...***

CamScanner

**दि.29/12/2025 ते दि.09/01/2026 या कालावधीमध्ये बैठकांचे आयोजन करण्यात येवून संघटनेचे प्रश्न तात्काळ नियमानूसार निकाली काढण्यात यावेत.**

सदर बैठकांचे जिल्हापातळीवर नियोजन करतांना सर्वच संघटनाना आमंत्रित करण्यात येवून व्यापक स्वरुपाची प्रसिध्दी देण्यात यावी जेणे करुन सर्वच संघटनांना त्यांचे सवंर्गाच्या सेवाविषयक प्रश्न मांडता येईल व त्याचे निरसण करणे जि.प. कार्यालयास सोयीस्कर होईल. उक्त वरिल प्रमाणे कार्यवाही करण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रस्तूत कार्यालयास दि.15 जानेवारी, 2026 पावेतो कार्यवृत्तांसह सादर करावा.

**जितेंद्र पापळकर** (भा.प्र.से.)
**विभागीय आयुक्त,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग**

**प्रत :-**

———————————————————————यांना माहितीस्तव.

*************

CamScanner